श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

कपिल गीता अध्याय(3.33)



वर्णन करने सांख्य योग का, और देने को ज्ञान ।
गुरु रूप में कपिल मुनि थे, देवहूति शिष्य समान।

नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

श्रीमद्भागवतमहापुराणम्
तृतीयं स्कंधः
॥ अथ त्रयस्त्रिं(म्)शोऽध्यायः ॥

मैत्रेय उवाच
एवं(न्) निशम्य कपिलस्य वचो जनित्री,
सा कर्दमस्य दयिता किल देवहूतिः ।
विस्रस्तमोहपटला तमभिप्रणम्य,
तुष्टाव तत्त्वविषयाङ्कितसिद्धिभूमिम् ॥ 1॥

मैत्रेय म्हणतात - श्रीकपिलांचा हा उपदेश ऐकून कर्दमांची प्रिय पत्नी देवहूतीचा मोहाचा पडदा दूर झाला आणि तिने सांख्यतत्त्वज्ञानाचे प्रवर्तक असलेल्या श्रीकपिलांना प्रणाम केला आणि ती त्यांची स्तुती करू लागली.

देवहूतिरुवाच

अथाप्यजोऽन्तः(स्)सलिले शयानं(म्),

भूतेन्द्रियार्थात्ममयं(वँ) वपुस्ते ।

गुणप्रवाहं(म्) सदशेषबीजं(न्),

दध्यौ स्वयं(यँ) यज्जठराब्जजातः ॥ 2॥

देवहूती म्हणाली - ज्यांच्या नाभिकमलातून ब्रह्मदेव प्रगट झाले होते, त्यांनीही प्रलयकालीन जलात शयन करणाऱ्या आपल्या पंचभूते, इंद्रिये, शब्दादी विषय आणि मन यांनी युक्त, सत्त्वादी गुणमय कार्य व कारण अशा दोन्हींचे बीज असणाऱ्या आपल्या व्यक्त स्वरूपाचे केवळ चिंतन केले होते. (ते प्रत्यक्ष पाहिले नव्हते.)

स एव विश्वस्य भवान् विधत्ते,

गुणप्रवाहेण विभक्तवीर्यः ।

सर्गाद्यनीहोऽवितथाभिसन्धि-

रात्मेश्वरोऽतर्क्यसहस्रशक्तिः ॥ 3॥

आपण निष्क्रिय, सत्यसंकल्प, संपूर्ण ज्ञानस्वरूप तसेच हजारो अचिंत्य शक्तींनी संपन्न आहात. आपल्या शक्तीला गुणप्रवाह-रूपाने ब्रह्मादी अनंत मूर्तींमध्ये विभक्त करून त्यांच्याद्वारा आपण स्वतःच विश्वाची उत्पत्ती इत्यादी करीत आहात.

स त्वं(म्) भृतो मे जठरेण नाथ,

कथं(न्) नु यस्योदर एतदासीत् ।

विश्वं(यँ) युगान्ते वटपत्र एकः(श्)

शेते स्म मायाशिशुरङ्घ्रिपानः ॥ 4॥

नाथ, प्रलयकाल आल्यावर ज्यांच्या पोटात हे सारे विश्व लीन होऊन जाते आणि ते कल्पांताच्या वेळी मायामय बालकाचे रूप धारण करून आपल्या पायाचा अंगठा चोखीत एकटेच वटवृक्षाच्या पानावर शयन करतात, त्या तुम्हांला मी गर्भामध्ये कसे काय धारण केले ? (हीही आपलीच माया नव्हे का ?)

त्वं(न्) देहतन्त्रः(फ्) प्रशमाय पाप्मनां(न्),

निदेशभाजां(ञ्) च विभो विभूतये ।

यथावतारास्तव सूकरादय-

स्तथायमप्यात्मपथोपलब्धये ॥ 5॥

हे विभो, आपण पापी लोकांना शासन आणि आज्ञाधारक भक्तांचे कल्याण करण्यासाठी स्वेच्छेने देह धारण करता. म्हणून जसे त्यासाठी आपले वराह आदी अवतार झाले, त्याचप्रमाणे हा कपिलावतारसुद्धा मुमुक्षूंना ज्ञानमार्ग दाखविण्यासाठी झाला आहे.

यन्नामधेयश्रवणानुकीर्तना-

द्यत्प्रह्वणाद्यत्स्मरणादपि क्वचित् ।

श्वादोऽपि सद्यः(स्) सवनाय कल्पते

कुतः(फ्) पुनस्ते भगवन्नु दर्शनात् ॥ 6॥

हे भगवन, आपल्या नावाचे श्रवणकीर्तन करण्याने किंवा चुकून-माकून आपल्याला नमस्कार अथवा आपले स्मरण करण्याने सुद्धा चांडाळ देखील तत्काळ सोमयागाला पात्र होऊ शकतो, तर मग आपले दर्शन घेण्याने मनुष्य कृतकृत्य होईल, यात काय शंका !

अहो बत श्वपचोऽतो गरीयान्,

यज्जिह्वाग्रे वर्तते नाम तुभ्यम् ।

तेपुस्तपस्ते जुहुवुः(स्) सस्नुरार्या

ब्रह्मानूचुर्नाम गृणन्ति ये ते ॥ 7॥

ज्याच्या जिभेवर आपले नाव आहे, तो चांडाळसुद्धा यामुळेच श्रेष्ठ होय. जे श्रेष्ठ पुरुष आपल्या नामाचे उच्चारण करतात, त्यांनी तप, हवन, तीर्थस्नान, सदाचारपालन आणि वेदाध्ययन असे सर्व काही केले, (असेच समजावे.)

तं(न्) त्वामहं(म्) ब्रह्म परं(म्) पुमां(म्)सं(म्),

प्रत्यक्स्रोतस्यात्मनि सं(वँ)विभाव्यम् ।

स्वतेजसा ध्वस्तगुणप्रवाहं(वँ),

वन्दे विष्णुं(ङ्) कपिलं(वँ) वेदगर्भम् ॥ 8॥

आपण साक्षात परब्रह्म आहात; आपणच परमपुरुष आहात, वृत्तींचा प्रवाह अंतर्मुख करून अंतःकरणात आपलेच चिंतन केले जाते. आपण आपल्या तेजाने मायेच्या गुणप्रवाहाला शांत करता. आपल्यातच वेद समाविष्ट आहेत. अशा साक्षात विष्णुस्वरूप कपिलांना मी प्रणाम करते.

मैत्रेय उवाच

ईडितो भगवानेवं(ङ्), कपिलाख्यः(फ्) परः(फ्) पुमान् ।

वाचा विक्लवयेत्याह, मातरं(म्) मातृवत्सलः ॥ 9॥

मैत्रेय म्हणतात - मातेने अशा प्रकारे स्तुती केल्यानंतर मातृवत्सल परमपुरुष भगवान कपिलदेव तिला गंभीर वाणीने म्हणाले.

कपिल उवाच

मार्गेणानेन मातस्ते, सुसेव्येनोदितेन मे ।

आस्थितेन परां(ङ्) काष्ठा-मचिरादवरोत्स्यसि ॥ 10॥

श्रीकपिल म्हणाले - माते, मी तुला जो हा सुलभ मार्ग सांगितला आहे, त्याचे अनुष्ठान केल्याने लवकरच तू परमपदाला जाशील.

श्रद्धत्स्वैतन्मतं(म्) मह्यं(ञ), जुष्टं(यँ) यद्ब्रह्मवादिभिः ।

येन मामभवं(यँ) याया, मृत्युमृच्छन्त्यतद्विदः ॥ 11॥

माझ्या या मतावर तू विश्वास ठेव. ब्रह्मवादी लोकांचे याचे अनुकरण केले आहे. याद्वारा तू माझ्या, जन्ममरणरहित स्वरूपाला प्राप्त करून घेशील. जे लोक माझे हे मत मानीत नाहीत, ते जन्म-मृत्यूच्या फेऱ्यात अडकतात.

मैत्रेय उवाच

इति प्रदर्शय भगवान्, सतीं(न्) तामात्मनो गतिम् ।

स्वमात्रा ब्रह्मवादिन्या, कपिलोऽनुमतो ययौ ॥ 12॥

मैत्रेय म्हणतात - अशा प्रकारे आत्मज्ञानाचा उपदेश करून श्रीकपिलदेव आपल्या ब्रह्मज्ञानी मातेची अनुमती घेऊन तेथून निघून गेले.

सा चापि तनयोक्तेन, योगादेशेन योगयुक् ।

तस्मिन्नाश्रम आपीडे, सरस्वत्याः(स्) समाहिता ॥ 13॥

तेव्हा देवहूतीसुद्धा सरस्वतीचा मुकुट शोभेल अशा आपल्या आश्रमात पुत्राने उपदेश केलेल्या योगसाधनेचे योगाभ्यास करीत समाधीत मग्न झाली.

अभीक्ष्णावगाहकपिशान्, जटिलान् कुटिलालकान् ।

आत्मानं(ञ्) चोग्रतपसा, बिभ्रती चीरिणं(ङ्) कृशम् ॥ 14॥

त्रिकाल स्नान करण्याने तिच्या कुरळ्या केसांचे धूसर जटांमध्ये रूपांतर झाले. तसेच वल्कलांनी झाकलेले शरीर उग्र तपस्येमुळे कृश झाले.

प्रजापतेः(ख्) कर्दमस्य, तपोयोगविजृम्भितम् ।

स्वगार्हस्थ्यमनौपम्यं(म्), प्रार्थ्यं(वँ) वैमानिकैरपि ॥ 15॥

तिने प्रजापती कर्दमांच्या तपश्चर्या आणि योगबलाने प्राप्त झालेल्या, देवांनी इच्छा करावी अशा अनुपम गृहस्थसुखाचा त्याग केला.

पयःफेननिभाः(श्) शय्या, दान्ता रुक्मपरिच्छदाः ।

आसनानि च हैमानि, सुस्पर्शास्तरणानि च ॥ 16॥

स्वच्छस्फटिककुड्येषु, महामारकतेषु च ।

रत्नप्रदीपा आभान्ति, ललनारत्नसं(यँ)युताः ॥ 17॥

गृहोद्यानं(ङ्) कुसुमिते, रम्यं(म्) बह्वमरद्रुमैः ।

कूजद्विहङ्गमिथुनं(ङ्), गायन् मत्तमधुव्रतम् ॥ 18॥

यत्र प्रविष्टमात्मानं(वँ), विबुधानुचरा जगुः ।

वाप्यामुत्पलगन्धिन्यां(ङ्), कर्दमेनोपलालितम् ॥ 19॥

हित्वा तदीप्सिततम-मप्याखण्डलयोषिताम् ।

किञ्चिच्चकार वदनं(म्), पुत्रविश्लेषणातुरा ॥ 20॥

जेथे दुधाच्या फेसाप्रमाणे स्वच्छ आणि कोमल शय्यांनी युक्त हस्तिदंती पलंग, सुवर्णपात्रे, सोन्याचे सिंहासन, त्यावर अतिकोमल गाद्या अंथरलेल्या आहेत, तसेच ज्याच्यामध्ये स्वच्छ स्फटिकमणी आणि उच्च प्रकारचे पाचू लावलेल्या भिंतींमध्ये रत्नजडित रमणीय मूर्तींसहित मणिमय दिवे झगमगत आहेत, जे फुलांनी लहडलेल्या अनेक दिव्य वृक्षांनी सुशोभित आहेत, ज्यामध्ये अनेक प्रकारच्या पक्ष्यांचा किलबिलाट आणि धुंद भ्रमरांचा गुंजारव होत आहे, जेथील कमलगंधांनी सुवासित सरोवरात कर्दमांच्या सहवासात त्यांचे प्रेम प्राप्त करून घेऊन क्रीडेसाठी प्रवेश केल्यावर जिचे गंधर्वगण गुणगान करीत असत आणि जे मिळविण्यासाठी इंद्रपत्न्या सुद्धा इच्छुक असत, अशा गृहोदानाची ममता तिने सोडून दिली. परंतु पुत्रवियोगाने व्याकूळ झाल्यामुळे तिचे वदन काहीसे उदास झाले.

वनं(म्) प्रव्रजिते पत्या-वपत्यविरहातुरा ।

ज्ञाततत्त्वाप्यभूत्तृष्टे, वत्से गौरिव वत्सला ॥ 21॥

पती वनात गेल्यानंतर पुत्राचाही वियोग झाल्याने ती आत्मज्ञानसंपन्न असूनही वासराचा वियोग झाल्यावर बरणाऱ्या गाईसारखी व्याकूळ झाली.

तमेव ध्यायती देव-मपत्यं(ङ्) कपिलं(म्) हरिम् ।

बभूवाचिरतो वत्स, निःस्पृहा तादृशे गृहे ॥ 22॥

विदुरा, आपला पुत्र कपिलदेवरूप भगवान हरींचे चिंतन करता करता लवकरच तिला असा ऐश्वर्यसंपन्न घराबद्दलसुद्धा उपरती झाली.

ध्यायती भगवद्रूपं(यँ), यदाह ध्यानगोचरम् ।

सुतः(फ्) प्रसन्नवदनं(म्), समस्तव्यस्तचिन्तया ॥ 23॥

नंतर कपिलदेवांनी भगवंतांच्या ज्या ध्यान करण्यायोग्य प्रसन्नवदनारविंदयुक्त स्वरूपाचे वर्णन केले होते, त्याच्या एकेक अवयवाचे तसेच त्याच्या समग्र स्वरूपाचे चिंतन करीत ती ध्यानमग्न झाली.

भक्तिप्रवाहयोगेन, वैराग्येण बलीयसा ।

युक्तानुष्ठानजातेन, ज्ञानेन ब्रह्महेतुना ॥ 24॥

विशुद्धेन तदाऽऽत्मान- मात्मना विश्वतोमुखम् ।

स्वानुभूत्या तिरोभूत-मायागुणविशेषणम् ॥ 25॥

भगवद्भक्तीचा प्रवाह, प्रबळ वैराग्य आणि यथोचित कर्मानुष्ठानामुळे उत्पन्न झालेल्या ब्रह्मसाक्षात्कार करून देणाऱ्या ज्ञानाने चित्त शुद्ध झाल्याने ती त्या सर्वव्यापक आत्म्याच्या ध्यानामध्ये मग्न झाली, जो आपल्या स्वरूपाच्या प्रकाशाने मायाजनित आवरण दूर करतो.

ब्रह्मण्यवस्थितमतिर्-भगवत्यात्मसं(म्)श्रये ।

निवृत्तजीवापत्तित्वात्- क्षीणक्लेशाप्तनिर्वृतिः ॥ 26॥

अशा प्रकारे जीवाचे अधिष्ठानभूत परब्रह्म श्रीभगवंतांमध्ये बुद्धी स्थिर झाल्यामुळे तिचा जीवभाव नाहीसा झाला आणि ती सर्व क्लेशांपासून मुक्त होऊन परमानंदात निमग्न झाली.

नित्यारूढसमाधित्वात्- परावृत्तगुणभ्रमा ।

न सस्मार तदाऽऽत्मानं(म्), स्वप्ने दृष्टमिवोत्थितः ॥ 27॥

आता निरंतर समाधिस्थ राहिल्याकारणाने तिचा विषयांच्या खरेपणाबद्दलचा भ्रम नाहीसा झाला आणि तिला आपल्या शरीराचीसुद्धा शुद्ध राहिली नाही. जसे जागा झालेल्या माणसाला आपण स्वप्नात पाहिलेल्या शरीराची शुद्ध राहत नाही.

तद्देहः(फ्) परतः(फ्) पोषोऽप्- यकृशश्चाध्यसम्भवात् ।

बभौ मलैरवच्छन्नः(स्), सधूम इव पावकः ॥ 28॥

स्वाङ्गं(न्) तपोयोगमयं(म्), मुक्तकेशं(ङ्) गताम्बरम् ।

दैवगुप्तं(न्) न बुबुधे, वासुदेवप्रविष्टधीः ॥ 29॥

तिच्या शरीराचे पोषण सुद्धा दुसऱ्यांकडून होत होते. परंतु कोणत्याही प्रकारचे मानसिक क्लेश नसल्याने शरीर दुर्बळ झाले नाही. तिचे तेज आणखीच वाढले, परंतु ते धुळीने माखल्यामुळे धुराने व्याप्त अग्नीप्रमाणे दिसू लागले. तिचे केस अस्ताव्यस्त विखुरले आणि वस्त्रही गळाले. परंतु नेहमी श्रीभगवंतांमध्ये चित्त लागून राहिल्यामुळे तिला आपल्या तपोयोगमय शरीराची काहीच शुद्ध राहिली नाही. केवळ प्रारब्धच त्याचे रक्षण करीत होते.

एवं(म्) सा कपिलोक्तेन, मार्गेणाचिरतः(फ्) परम् ।

आत्मानं(म्) ब्रह्मनिर्वाणं(म्), भगवन्तमवाप ह ॥ 30॥

अशा प्रकारे देवहूतीने कपिलांनी सांगितलेल्या मार्गाने थोड्याच दिवसांत नित्यमुक्त, परमात्मस्वरूप, श्रीभगवंतांना प्राप्त करून घेतले.

तद्वीरासीत्पुण्यतमं(ङ्), क्षेत्रं(न्) त्रैलोक्यविश्रुतम् ।

नाम्ना सिद्धपदं(यँ) यत्र, सा सं(म्)सिद्धिमुपेयुषी ॥ 31॥

वीरवर, ज्या स्थानावर तिला सिद्धी प्राप्त झाली, ते परम पवित्र क्षेत्र त्रैलोक्यात 'सिद्धपद' (सिद्धपूर) नावाने प्रख्यात झाले.

तस्यास्तद्योगविधुत-मार्त्यं(म्) मर्त्यमभूत्सरित् ।

स्रोतसां(म्) प्रवरा सौम्य, सिद्धिदा सिद्धसेविता ॥ 32॥

विदुरा, योगसाधनेने तिच्या शरीराचा सर्व मळ नाहीसा झाला आणि एका नदीच्या रूपात परिणत झाला, तीच सिद्धगणांकडून सेवन केली जाणारी आणि सर्व प्रकारच्या

कपिलोऽपि महायोगी, भगवान् पितुराश्रमात् ।

मातरं(म्) समनुज्ञाप्य, प्रागुदीचीं(न्) दिशं(यँ) ययौ ॥ 33॥

महायोगी भगवान कपिलसुद्धा मातेची आज्ञा घेऊन पित्याच्या आश्रमातून ईशान्य दिशेकडे निघून गेले.

सिद्धचारणगन्धर्वैर्- मुनिभिश्चाप्सरोगणैः ।

स्तूयमानः(स्) समुद्रेण, दत्तार्हणनिकेतनः ॥ 34॥

आस्ते योगं(म्) समास्थाय, साङ्ख्याचार्यैरभिष्टुतः ।

त्रयाणामपि लोकाना- मुपशान्त्यै समाहितः ॥ 35॥

तेथे स्वतः समुद्राने त्यांचे पूजन करून त्यांना स्थान दिले. ते तिन्ही लोकांना शांती प्रदान करण्यासाठी योगमार्गाचा अवलंब करून समाधीमध्ये स्थिर झाले. सिद्ध, चारण, गंधर्व, मुनी आणि अप्सरागण त्यांची स्तुती करतात. तसेच सांख्याचार्य सुद्धा त्यांचे सर्व प्रकारे स्तवन करीत असतात.

एतन्निगदितं(न्) तात, यत्पृष्टोऽहं(न्) तवानघ ।

कपिलस्य च सं(वँ)वादो, देवहूत्याश्च पावनः ॥ 36॥

हे निष्पाप विदुरा, तू विचारल्यावरून तुला हा कपिल आणि देवहूतीचा परम पवित्र संवाद ऐकविला.

य इदमनुशृणोति योऽभिधत्ते,

कपिलमुनेर्मतमात्मयोगगुह्यम् ।

भगवति कृतधीः(स्) सुपर्णकेता-

वुपलभते भगवत्पदारविन्दम् ॥ 37॥

हे कपिलदेवांचे मत अध्यात्मयोगाचे गूढ रहस्य आहे. जो पुरुष याचे श्रवण किंवा वर्णन करतो, तो भगवान गरुडध्वजांच्या भक्तीने युक्त होऊन लवकरच श्रीहरींच्या चरणारविंदांना प्राप्त करतो.

इति श्रीमद्भागवते महापुराणे वैयासक्यामष्टादशसाहस्र्यां(म्)

पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायां(न्) तृतीयस्कन्धे

कापिलेयोपाख्यानेत्रयस्त्रिं(म्)शत्तमोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥